# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड   जा. क्रं.  86 / 2024   दिनांक : 05.03.2024**

## 1)जबरी चोरी :–

**नांदेड ग्रामीण** :–दिनांक 29.02.2024 रोजी चे 15.30 वा. चे सुमारास, **टापरे चौक वाजेगाव ता. जि. नांदेड येथे,** यातील अज्ञात तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीची बुलेट क्रमांक एमएच–26/बीयु–ला त्यांचे काळया रंगाचे शाईन कंपणीची विना नंबरची मोटार सायकलने पाठीमागुन धडक देवुन पाडले व फिर्यादीचे पॅन्टचे उजवे खिशातील नगदी 90,000/–रू व एक विवो कंपणीचा मोबाईल किंमती 25,000/–रू चा असा एकुण 1,15,000/–रू चा माल जबरीने काढुन घेवुन खंजरने पाठीवर, कमरेवर, वार करून गंभीर जखमी केले. वगैरे **फिर्यादी श्रिनिवास अशोक कोंडावार, वय 32 वर्षे, व्यवसाय फायनान्स कलेक्शन रा. भगवान बाबा चौक लातुर फाटा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 164/2024 कलम 397, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कोरे, मो.नं. 8888836607** हे करीत आहेत.

## 2)प्राण्यास क्रुरतेने वागणुक :–

**हिमायतनगर** :–दिनांक 04.03.2024 रोजी चे 12.00 वा. चे सुमारास, **सोनारी फाटा ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करून आपले ट्रक क्रमांक एमएच–40/सीएम–2712 चा चालक मालक व ट्रक क्रमांक सीजी–/04जेडी चे चालक मालक व ट्रक मधील 55 गोवंश जातीचे जनावरांना निर्दयपणे डांबुन क्रुरतेने इजा होईल अशा पध्दतीने अवैधपणे कत्तल करण्यासाठी घेऊन जात असतांना दोन ट्रक किंमती अंदाजे 14,00,000/–रू व 55 गोवंश किंमती 16,50,000/–रू असा एकुण 30,50,000/–रू चा मालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री नंदलाल भुरालाल चौधरी, ने. पोस्टे हिमायतनगर** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरन 33/2024 कलम 5(अ)(बी) महाराष्ट्र प्राणी संरक्षण सुधारणा अधिनियम 1976 सह कलम 11(1)(ड)11(1)(इ) प्रांण्याचा छळ प्रतिबंध अधिनियम 1960 कायदा सह कलम प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2303 शिंगणवाड, मो. नं. 9049075521** हे करीत आहेत.

## 3)भारतीय हत्यार कायदा :–

**शिवाजीनगर** :–दिनांक 04.03.2024 रोजी चे 21.10 चे सुमारास, **साठे चौकाच्या बाजुला पेट्रोलपंप समोरील रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यात लोखंडी तलवार बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/835 रविशंकर पदमाकर बामणे, वय 39 वर्षे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 81/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1007 झांबरे, मो.क्रं. 9923922533** हे करीत आहेत.

## 4)गळफास घेवुन आत्महत्या :–

**1)नायगांव** :–दिनांक 03.03.2024 रोजी चे 17.00 ते दिनांक 04.03.2024 चे 11.30 वा. दरम्यान, **मौ. मांजरम शिवार कोलंबी जाणारे रोडवर कुठे ता. नायगांव जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे नामदेव प्रभु गायकवाड, वय 30 वर्षे,** रा. **नांदगाव ता. मुखेड ह. मु. बळीरामपुर नांदेड** यांनी पेपर टाकण्यासाठी ओमनी गाडी घेवुन गेल्यावर संजय विश्वांभर शिंदे, यांचे शेतात मांजरम शिवारात कोलंबी जाणारे रोडवर लिंबाचे झाडाला नायलॉन पटाने गळफास घेवुन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार पुनम नामदेव गागलवाड, वय 25 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. नांदगाव ता. मुखेड ह. मु. बळीरामपुर नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नायगांव** आ. मृ. 08/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2040 शेख, मो.नं. 8793872040** हे करीत आहेत.

**2)सोनखेड** :–दिनांक 03.03.2024 रोजी चे 18.00 वा. चे सुमारास, **मौ. शेलगाव (धा) ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे हाणमंत गोविंद कौशल्य, वय 21 वर्षे, रा. शेलगाव (धा) ता. लोहा जि. नांदेड** यांनी मराठा आरक्षण मिळत नसल्याने ताण तणावात राहाते घरी पांढरे रूमालाने छताचे कडीस गळफास घेवुन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार ज्ञानेश्वर गोविंद कौशल्ये, वय 27 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. शेलगाव (धा) ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे सोनखेड** आ. मृ. 04/2024 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री गीते, मो.नं. 8888655866** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड